R.No. MHHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ४२

दि.२३ जानेवारी २०२६, वार :शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## तुमच्या शहराचा महापौर कोण? आरक्षणाची सोडत जाहीर; लातूरमध्ये एससी महिला महापौर निश्चित

मुंबई :- राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर सर्वांचे लक्ष लागून राहिलेली महापौरपदाची आरक्षण सोडत आज मंत्रालयात पार पडली. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पूर्ण झाली.

महाराष्ट्रात १५ जानेवारी रोजी मतदान झाले होते, तर १६ जानेवारीला निकाल जाहीर झाले. आजच्या आरक्षण सोडतीमुळे अनेक महानगरपालिकांमध्ये कोणत्या पक्षाचा आणि कोणत्या प्रवर्गाचा महापौर बसणार, याचे चित्र स्पष्ट झाले आहे.या सोडतीमुळे राज्यातील अनेक मोठ्या शहरांतील सत्तासमीकरणे बदलणार असून, महिला आरक्षणामुळे अनेक दिग्गज नेत्यांच्या राजकीय गणितांना धक्का बसण्याची शक्यता आहे.९ आरक्षणाचे सविस्तर गणितमंत्रालयात झालेल्या सोडतीनुसार २९ महापालिकांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे :

अनुसूचित जाती (डउ) : ३ महापालिका

अनुसूचित जमाती (डढ) : १ महापालिका (कल्याणडोंबिवली) इतर मागासवर्गीय (जइउ) : ८ महापालिका सर्वसाधारण (जशिप) : १७ मराठवाड्यातील चित्र लातूर अनुसूचित जाती (डउ) : महिला जालना नवनियुक्त) अनुसूचित जाती (डउ) : महिला छत्रपती संभाजीनगर सर्वसाधारण : खुला नांदेड-वाघाळा सर्वसाधारण : खुला परभणी सर्वसाधारण : खुला

किती महापालिकांत महिला महापौर? राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी एकूण १५ महापालिकांमध्ये महिला महापौर विराजमान होतील. ५० टक्के महिला आरक्षणानुसार ही विभागणी करण्यात आली आहे.

अहिल्यानगर, जळगाव, अकोला आणि चंद्रपूर येथे ओबीसी महिला महापौर, तर लातूर आणि जालना येथे एससी महिला महापौर निश्चित झाले आहेत.

लातूरवर विशेष लक्ष लातूर महानगरपालिकेत एससी महिला आरक्षण जाहीर झाल्याने राजकीय वातावरण तापले आहे. काँग्रेसकडे स्पष्ट बहुमत असल्याने महापौरपदावर काँग्रेसचीच उमेदवार विराजमान होणार हे निश्चित मानले जात आहे. सध्या काँग्रेसमध्ये कांचन अजनीकर आणि जयश्री सोनकांबळे या दोघींमध्येच खरी लढत असल्याची चर्चा असून, कोणाच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडणार याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## रक्तदान जीवदान! | राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत लातूर येथे रक्तदान शिबिर

लातूर :-२२ जानेवारी २०२६ रोजी 'राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६' अंतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर मा. विनोद चव्हाण (प्रादेशिक परिवहन अधिकारी, लातूर) यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले.



या रक्तदान शिबिरात एकूण ५५ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला. शिबिरात प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गासह महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ, लातूर येथील अधिकारी व कर्मचारी, वाहन चालक तसेच तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रक्तदानासारख्या सामाजिक उपक्रमातून रस्ता सुरक्षा अभियानाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला. रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचू शकतात, ही भावना लक्षात घेऊन सहभागी रक्तदात्यांनी मोठ्या उत्साहात या उपक्रमात भाग घेतला.

या उपक्रमाबद्दल आयोजकांनी सर्व रक्तदात्यांचे आभार मानत, भविष्यातही असे सामाजिक उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.

## संस्कृती, मराठी भाषा आणि तंत्रज्ञानाचा समन्वय काळाची गरज मंत्री ड.आशिष शेलार

मुंबई: सार्वजनिक उत्सव, व्याख्यानमाला आणि सांस्कृतिक उपक्रम हे समाज, संस्कृती, राष्ट्र आणि एकता यांना एकत्र आणणारे प्रभावी माध्यम आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या दीर्घ परंपरेप्रमाणेच बौद्धिक समृद्धी देणाऱ्या व्याख्यानमालांची परंपरा शासनाने पुढे नेण्याचा निर्णय घेतला असून, त्यातील हा पहिला उपक्रम आहे, असे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार म्हणाले.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या वतीने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेचा शुभारंभ सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार यांच्या उपस्थितीत रवींद्र नाट्यमंदिर येथे झाला. या व्याख्यानमालेच्या उद्घाटनपर भाषणात ते बोलत होते. पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, ज्येष्ठ लेखक, विचारवंत आणि अभ्यासक अच्युत गोडबोले, सल्लागार समितीचे सदस्य, डॉ. शिरीष ठाकूर आणि सोनिया परचुरे यावेळी उपस्थित होते.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावावर भाष्य करताना सांस्कृतिक कार्य मंत्री ड.शेलार म्हणाले की, आज प्रत्येक नागरिकाचा तंत्रज्ञानाशी थेट संबंध आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सद्वारे मोठ्या प्रमाणावर माहिती संकलित होत असून, या तंत्रज्ञानाचा योग्य, सुरक्षित आणि सकारात्मक वापर कसा करायचा हे समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. या विषयावर अच्युत गोडबोले यांच्यासारख्या अभ्यासू वक्त्यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गडकिल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा मिळवून देण्याच्या प्रक्रियेचा उल्लेख करताना सांस्कृतिक कार्य मंत्री ड. शेलार यांनी सांगितले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या सक्रिय प्रयत्नांमुळे हा ऐतिहासिक निर्णय शक्य झाला. महाराजांची



'रयतेचा राजा' आणि 'उपभोगशून्य स्वामी' ही संकल्पना जागतिक स्तरावर मांडण्यात महाराष्ट्राला यश आले, याचा अभिमान असल्याचेही ते म्हणाले.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर साहित्य, लोककला, लोकसंगीत, विज्ञान, तंत्रज्ञान आणि विविध क्षेत्रांतील मराठी निर्मितीला चालना देण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध असल्याचे मंत्री ड. शेलार यांनी सांगितले. राज्यात वर्षभरात १२०० हून अधिक सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जात असून, ही महाराष्ट्राची सांस्कृतिक 'सॉफ्ट पॉवर' असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक जोगळेकर म्हणाल्या की, गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानंतर संपूर्ण राज्यभर वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून व्याख्यानमाला हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या व्याख्यानमालेंतर्गत ज्येष्ठ लेखक, विश्लेषक व अभ्यासक अच्युत गोडबोले 'ए आय तंत्रज्ञान व कलाविश्व' या विषयावर संवाद साधला. २३ जानेवारी रोजी पुरातत्वशास्त्रज्ञ आणि पुरातत्व व वस्तूसंग्रहालय संचालनालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे ' छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांच्या युनेस्को नामांकनाचा रोमांचक प्रवास' आणि २४ जानेवारी रोजी मराठी भाषा विभाग व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी ' अभिजात मराठी : इतिहास वर्तमान व भविष्य ' या विषयांवर संवाद साधणार आहेत.

## केज येथे अनुष्का पाटोळे च्या सन्मानार्थ कॅण्डल मार्च

केज/प्रतिनिधी-अनुष्का पाटोळ च्या




समानार्थ आज शुक्रवार रोजी केज शहरात कॅण्डल मार्च चे आयोजन करण्यात आलेले आहे तरी विद्यार्थी, विद्यार्थिनी व विविध संघटनेचे, पक्षाचे पदाधिकारी आणि नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आलेले आहे.

राष्ट्रीय अत्याचार निवारण शक्ती (छरष, नफ) , तसेच लहुजी क्रांती मोर्चा, महाराष्ट्र राज्य च्या वतीने बहुजन समाजातील सर्व सामाजिक संघटना, पक्ष यांना सोबत घेऊन जिजाऊ, अहिल्या, सावित्री, फातेमा, रमाई, मुक्ता ची लेक अनुष्का ला न्याय देण्यासाठी केज येथे उद्या शुक्रवार दिनांक २३ जानेवारी रोजी सायंकाळी ६-०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक तें सविंधान चौका पर्यंत केज येथे भव्य कॅण्डल मार्च चे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व सामाजिक संघटना, पक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थिनी, शिक्षक, महिला, युवा, यांनी मोठ्या संख्येने कॅण्डल मार्च मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्षा डॉ.सौ.सिताताई बनसोड, ड. वैजेनाथ वाघमारे, भाई मोहन गुंड, प्रा. हनुमंत भोसले सर, बाबुराव गालफाडे सर, चंद्रकांत खरात सर,डि.के. जाधव नाना, व्यंकटराव हजारे,दगडू तात्या गालफाडे,दिपक कांबळे, सुनील जी हिरवे,लखन हजारे,शितल लांडगे, ईरफान पठाण,रोहित कसबे, गौतम बचूटे, शरद थोरात, दिलीप बनसोडे, अनिल लोखंडे, ईश्वर सोनवणे, अजय गालफाडे, साहिल तांबोळी ईत्यादीने केले आहे

## बजाज पुणे ग्रँड टूर २०२६; उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

पुणे,: 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' चा तिसरा टप्पा आतापर्यंतचा सर्वात आव्हानात्मक ठरला. पश्चिम घाटाच्या प्रवेशद्वारावर सायकलस्वारांच्या कौशल्याची आणि सहनशक्तीची मोठी परीक्षा पाहायला मिळाली.



शर्यतीच्या या आव्हानात्मक तिसऱ्या टप्प्यात चीनच्या 'ली निंग स्टार' संघाचा कॅमेरून निकोलस स्कॉट याने बाजी मारली. त्याने १३७ किलोमीटरच्या हा टप्पा ३ तास ४ मिनिटे आणि १३ सेकंदांत पार केला. अर्थात, क्रमवारीत अव्वल क्रमांक कायम राखून ल्यूक मुडग्वे याने 'यलो जर्सी'वरील वर्चस्व कायम राखले आहे.

सासवड नगर परिषदेच्या चंदन टेकडी येथून दुपारी १२:३० वाजता या टप्प्याला सुरुवात झाली. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी हिरवा झेंडा दाखवून या शर्यतीचा शुभारंभ केला. या वेळी राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार, आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप, नगराध्यक्ष आनंदी जगताप, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सचिव संजय शेटे आदी उपस्थित होते. 'भारत माता की जय', 'जय भवानी जय शिवाजी', 'गणपती बाप्पा मोरया' अशा घोषणांनी शाळेच्या मुलांनी आणि उपस्थित नागरिकांनी परिसर दणाणून सोडला.

यानंतर सायकलपटूंनी बारामतीच्या दिशेने कूच केले आणि विद्या प्रतिष्ठानच्या पेन्सिल चौक येथील फिनिश लाईनच्या जवळ आले, तेव्हा शर्यत अधिक तीव्र झाली. तीन तास खेळाडूंमध्ये जबरदस्त चुरस बघायला मिळाला. यात स्कॉट सर्वांत वेगवान ठरला. अंतिम टप्प्यात स्कॉटने वेग वाढवला. यात त्याने स्पेनच्या बुर्गोस बुर्पेललेट बीएच संघाच्या जॉर्जिओस बुग्लासला (३ तास ०४ मिनिटे १३ सेकंद) मागे टाकले. तो दुसऱ्या क्रमांकावर राहिला. बेल्जियमच्या टार्टेलेटो-आयसोरेक्स संघाचा तिमोथी ड्युपॉन्ट (३ तास ०४ मिनिटे १३ सेकंद) तिसऱ्या स्थानावर राहिला. मलेशियाच्या तेरेंगानू सायकलिंग टीमचा झेब कायफिन चौथ्या क्रमांकावर राहिला. पहिल्या दोन टप्प्यांचा विजेता ल्यूक (३ तास ०४ मिनिटे १३ सेकंद) या वेळी सहाव्या स्थानावर राहिला. मात्र, त्याने 'बेस्ट स्प्रिंटर'साठीची हिरवी जर्सी मिळवली आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे एकूण क्रमवारीत अव्वल स्थान कायम राखून 'पिवळी जर्सी' स्वतःकडेच ठेवली. तीन टप्प्यांनंतर ल्यूक एकूण ७ तास ३६ मिनिटे १० सेकंद वेळेसह पहिल्या स्थानावर आहे. थायलंडच्या रुजाई इन्शुरन्स विन्स्पेसच्या कार्टर लन बेटल्सपेक्षा तो केवळ १४ सेकंदांनी पुढे आहे.हा टप्पा अनेकांच्या अपेक्षेपेक्षा जास्त कठीण होता. सुरुवातीचे दोन चढण मार्ग आव्हानात्मक होते आणि वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने सायकल चालवणे कठीण जात होते; पण वळणदार रस्त्यांवर सायकल चालवताना मला खूप मजा आली. कॅमेरून स्कॉट

शुक्रवारी शेवटचा टप्पाआता सर्वांचे लक्ष चौथ्या टप्प्याकडे म्हणजेच 'पुणे प्राईड लूप'कडे लागले आहे. हा टप्पा ९५ किलोमीटरचा असून, तो पुण्यातील ऐतिहासिक शनिवारवाडा आणि आधुनिक भागांमधून जाणार आहे. बालेवाडी ते जे. एम. रोड असा टप्पा असणार आहे. ल्यूकने यलो जर्सी राखली असली, तरी इतर स्पर्धकांमधील सेकंदांचे अंतर पाहता अंतिम टप्पा अत्यंत रोमांचक होणार आहे.

महत्त्वाच्या जर्सी आणि विजेते

यलो जर्सी (एकूण विजेता) ल्यूक मुडग्वे

ग्री जर्सी (बेस्ट स्प्रिंटर) जॉर्जिओस बुग्लास (बुर्गोस बुर्पेललेट बीएच)

पोल्का डॉट जर्सी (किंग ऑफ माउंटेन्स) क्लेमेंट अलेनो (बुर्गोस बुर्पेललेट बीएच)

ऑरेंज जर्सी (बेस्ट एशियन रायडर) जंबालजाम्तस सैनबायर (बुर्गोस बुर्पेललेट बीएच)

व्हाइट जर्सी (बेस्ट यंग रायडर )- व्हिएगो टिजसेन (विलरप्लोईग ग्रूट मस्टरडॅम)

ब्लू जर्सी (भारताचा सर्वोत्तम खेळाडू) हर्षवीर सिंग सेखॉन

## संपादकीय...

### २९ महानगरपालिकांतील आरक्षण सोडत शहरी राजकारणातील निर्णायक वळण

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर सर्वाधिक प्रतीक्षा ज्या प्रक्रियेची होती, ती म्हणजे महापौरपदाची आरक्षण सोडत. अखेर ही सोडत मंत्रालयात पार पडली आणि महाराष्ट्रातील शहरी राजकारणाचे चित्र मोठ्या प्रमाणात स्पष्ट झाले. ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्ता, नेतृत्व, सामाजिक समावेश आणि राजकीय रणनीती यांना नवे वळण देणारी घटना ठरली आहे.

=९ आरक्षण सोडत म्हणजे काय सांगते? या सोडतीनुसार २९ महानगरपालिकांपैकी १५ ठिकाणी महिला महापौर

३ ठिकाणी अनुसूचित जाती (डउ)

१ ठिकाणी अनुसूचित जमाती (डढ)

८ ठिकाणी इतर मागासवर्गीय (जइउ)

१७ ठिकाणी सर्वसाधारण प्रवर्ग

असा प्रवर्गनिहाय आरक्षणाचा आराखडा समोर आला आहे. हे आकडे केवळ सांख्यिकी नाहीत, तर शहरी सत्तेच्या केंद्रात सामाजिक न्याय पोहोचत असल्याचे द्योतक आहेत.

महिला आरक्षण : संधी की आव्हान?

५० टक्के महिला आरक्षणामुळे अनेक महानगरपालिकांमध्ये पुरुषप्रधान राजकारणाला मोठा धक्का बसला आहे. अनेक दिग्गज, अनुभवी पुरुष नेत्यांना बाजूला राहावे लागणार असून, राजकीय पक्षांना नव्या महिला नेतृत्वावर विश्वास ठेवावा लागणार आहे.

मात्र, खरा प्रश्न असा आहे की

महिला महापौर केवळ आरक्षणामुळे सत्तेवर येतील की त्यांना स्वतंत्र निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले जाईल?

जर महिला महापौरांना केवळ प्रतिनिधी चेहरा बनवले गेले, तर आरक्षणाचा मूळ उद्देशच अपूर्ण राहील. प्रशासन, निधीवाटप, विकास आराखडे आणि धोरणात्मक निर्णयांमध्ये त्यांचा खरा सहभाग असणे अत्यावश्यक आहे.

मराठवाड्याचे विशेष महत्त्व

मराठवाड्यातील लातूर आणि जालना येथे अनुसूचित जाती महिला महापौर आरक्षण निश्चित होणे, हे सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. या भागात सामाजिक समता, प्रतिनिधित्व आणि नेतृत्वाबाबत कायम चर्चा होत आली आहे.

या आरक्षणामुळे दलित महिलांना थेट सत्ताकेंद्रात काम करण्याची संधी मिळणार आहे. मात्र, या संधीचे रूपांतर परिवर्तनात होईल की नाही, हे त्या महापौरांच्या कार्यक्षमतेवर आणि पक्षांच्या भूमिकेवर अवलंबून असेल.

राजकीय पक्षांची कसोटी

आरक्षण सोडतीनंतर प्रत्येक पक्षासमोर तीन मोठी आव्हाने उभी राहिली आहेत योग्य महिला उमेदवार निवडणे अंतर्गत गटबाजी टाळणे महापौरांना स्वायत्तपणे काम करू देणे विशेषतः ज्या ठिकाणी पक्षाकडे स्पष्ट बहुमत आहे, तिथेही महापौर निवड गटनेते, आमदार, मंत्री यांच्या इच्छेवर अवलंबून राहते, हे वास्तव आहे. त्यामुळे आरक्षण असूनही लोकशाही किती सक्षम आहे, याची खरी परीक्षा आता सुरू झाली आहे.

आरक्षण सोडत : शेवट नव्हे, सुरुवात ही आरक्षण सोडत म्हणजे एखाद्या प्रक्रियेचा शेवट नसून, जबाबदारीची सुरुवात आहे. शहरांच्या पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, वाहतूक, आरोग्य, शिक्षण, झोपडपट्टी पुनर्विकास अशा मूलभूत प्रश्नांवर आता महिला नेतृत्वाने ठोस निर्णय घेणे अपेक्षित आहे.

निष्कर्ष

२९ महानगरपालिकांतील आरक्षण सोडत महाराष्ट्राच्या शहरी राजकारणाला समावेशकतेची दिशा देणारी आहे. मात्र आरक्षण हे साधन आहे, उद्दिष्ट नव्हे. जर या आरक्षणातून सक्षम, निर्णयक्षम आणि संवेदनशील नेतृत्व पुढे आले, तरच ही सोडत ऐतिहासिक ठरेल. अन्यथा ती केवळ सत्तांतराची आकडेमोड ठरेल.

आता खरा प्रश्न एकच आहे आरक्षणातून आलेले नेतृत्व शहरांचा चेहरामोहरा बदलू शकणार का? याचे उत्तर पुढील काळात महापौरांच्या कामगिरीतूनच मिळेल.

### वाशी नवी मुंबई येथे सुरू असलेल्या श्रामनेरी/ बौद्धाचार्या संघाला कल्याणराव हनवते यांनी केले फळअहार आणि धम्मदान

नवी मुंबई / के. एच. हनवते :-दि बुद्धी सोसायटी ऑफ इंडिया



तथा भारतीय बौद्ध महासभा या धार्मिक मातृ संस्थेच्या अंतर्गत नवी मुंबई जिल्हा महिला शाखेच्या विद्यमाने बुद्ध प्रतिष्ठान वाशी नवी मुंबई येथे श्रामणेरी /बौद्धाचार्या शिबिर दिनांक : १७ /०१/ २०२६ ते २६ / जानेवारी / २०२६ पर्यंत सुरू असलेल्या या धम्म परिषदेचा समारोप २६ जानेवारी रोजी डॉ. भीमराव भैय्यासाहेब आंबेडकर (भारतीय बौद्ध महासभा कार्याध्यक्ष, व समता सैनिक दल राष्ट्रीय अध्यक्ष ) यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य दिव्य *धम्म परिषद* संपन्न होणार आहे तरी या श्रामणेरी संघाला व धम्म परिषदेला ज्यांना कुणाला भोजनदान, धम्मदान, श्रमदान द्यावयाचे आहे अशा बौद्ध उपासक - उपासिका यांनी श्रामनेरी / बौद्धाचार्य संघाला आपली एक सामाजिक बांधिलकी समजून या शिबिराला सदिच्छा भेट द्यावी व आपले स्वच्छणे धम्मदान करावे ज्याने करून धम्माचा रथ अधिक जोमाने गतिमान होईल, डॉ. बाबासाहब आंबेडकर करे पुकार बौद्ध धम्म का करो स्वीकार (प्रसार).

# स्वीकृत नगरसेवक पद राजकीय पातळीवर देण्यापेक्षा ;सामाजिक पातळीवर दिले तर राज्याचे नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले जाईल.

राज्यात व जिल्ह्यात महानगरपालिका निवडणुका झाल्यात आणि त्यातुनच नगरची सेवा करण्यासाठी नगरसेवकांची नियुक्ती झाली आहे.या नगरसेवकांना जनतेचा कौल मिळाला त्यामुळे हे नगरसेवक जनप्रतिनिधींची भूमिका निभविणार आहेत.या व्यतीरीक्त प्रत्येक महानगरपालिकेमध्ये अंदाजे १५ नगरसेवकांमागे १ स्वीकृत नगरसेवक अशा पध्दतीचे त्या-त्या महानगरपालिकेमध्ये अंदाजे १० किंवा कमी-जास्त स्वीकृत नगरसेवकसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.कोणाला स्वीकृत नगरसेवक करायचे हा अधिकार प्रत्येक राजकीय पक्षांच्या नेत्यांना असतोच यात दुमत नाही.परंतु राजकीय पक्षांसोबत जर सामाजिक कार्यातील व्यक्ती जुळली तर विकास भरभराटीला येईल.शहराच्या विकासाला खरोखरच गती यावी असे जर सरकारला वाटत असेल तर मग सामाजिक कार्यातील पत्रकार, लेखक, पर्यावरणवादी, अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना स्वीकृत सदस्य म्हणून का घेऊ नये?जिथे विकास हे ध्येय आहे.तिथे त्याग हा असलाच पाहिजे व त्यागाची भावना राजकीय पक्षांनी ठेवली पाहिजे.याकरीता थोडे राजकारण बाजूला सारून सामाजिक कार्याला सुध्दा प्राधान्य दिले पाहिजे. त्याचप्रमाणे संपूर्ण राजकीय पक्ष आपापल्या पक्षांचे उमेदवार निवडून यावे यासाठी प्रयत्नशील असतात आणि असायलाच हवे.परंतु प्रत्येक महानगरपालिकेच्या अंतर्गत सामाजिक कार्यशैलीला कुठेतरी मानाचे स्थान असने गरजेचे आहे. सामाजिक कार्य करणारे निष्ठावंत,विचारवंत व समाजासाठी झटणारे वेगवेगळ्या क्षेत्रातील समाजसेवक सुद्धा असतात आणि आहेत त्यांचे कार्य अफाट असते परंतु दिसत नाही,ही बाब राजकीय पुढाऱ्यांनी सुद्धा लक्षात ठेवली पाहिजे.यात प्रामुख्याने पत्रकार, लेखक, साहित्यिक, स्वतंत्र पत्रकार, विचारवंत,पर्यावरण प्रेमी,निवृत्त अग्निशमन अधिकारी, सैन्यदलातील निवृत्त अधिकारी, निसर्ग प्रेमी इत्यादी अशा अनेक प्रकारच्या सतत सामाजिक कार्यासाठी झटणाऱ्या व गल्ली पासून तर दिल्ली पर्यंत व दिल्ली पासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत लेखणीच्या माध्यमातून असो अथवा आपापल्या कार्यक्षेत्राच्या माध्यमातून असो अशांचा मानसन्मान कुठेतरी व्हायला हवा व त्यांच्या कार्याची पावती त्यांना कुठेतरी पुरस्कार रूपात मिळायला हवी म्हणून स्वीकृत नगरसेवकांच्या रूपात त्यांना मानाचे स्थान मिळायला हवे असे मला वाटते. कारण राजकारणाच्या ठिकाणी राजकारण ठीक आहे. परंतु सामाजिक कार्याला एक नवी चालना देण्याच्या उद्देशाने सरकारने व प्रशासनाने पाऊल उचलले पाहिजे. कारण स्वीकृत सदस्य हा पर्याय सरकार जवळ असल्याने याला राजकारणात गूरफटने योग्य नाही. यावर सरकारने, सन्माननीय राज्यपाल, सन्माननीय मुख्यमंत्री यांनी गांभीर्याने विचार करून सामाजिक कार्याला नवीन दिशा देवून विकासाला वेग देण्यासाठी एक नवीन पाऊल उचलने गरजेचे आहे.आज पत्रकार, लेखक आपल्या लेखणीच्या माध्यमातून गल्लीपासून तर आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंतची माहिती प्रत्येकांच्या घरोघरी पोहचविण्याचे कार्य करीत असतो. अशांना सरकारने स्वीकृत नगरसेवकांची जबाबदारी दिली तर सामाजिक कार्याला मोठी मदत होईल. राजकीय पुढारी हा आपल्या पद्धतीने कार्य करेलच यात दुमत नाही.परंतु सामाजिक क्षेत्रातील समाजसेवक हे आपले कार्य आगळ्यावेगळ्या पद्धतीने करून एक नवीन विकासाचे पाऊल उभे करू शकते व नवीन ऊर्जा निर्माण करू शकते. कारण सामाजिक कार्याची जाणीव व दांडगा अनुभव यांना पुर्वीपासूनच असतो फक्त साथ हवी सरकारची व राजकीय पक्षांची.त्यामुळे सरकारने राजकीय ताळमेळासोबत सामाजिक कार्याची बांधिलकी जपणाऱ्यांना जर सरकारने स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती केली तर शहराच्या विकासामध्ये मोठी भर पडेल व मदत होईल. सरकारला माझी विनंती आहे की स्वीकृत नगरसेवकांच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने विचार करायला हवा.कारण अत्याधुनिक युगात शहर, राज्य, देश सध्याच्या परिस्थितीत विकासाचा महामेरू उभा करीत आहे यात स्वीकृत नगरसेवकसेवकांच्या माध्यमातून महानगरपालिकेमध्ये सामाजिक कार्याची भर पडली तर अवश्य त्याचे सोन होईल.कारण राज्यातील महापालिकांमध्ये जर सामाजिक कार्यातील व्यक्ती सहभागी झाली तर राज्यातील चित्र आगळेवेगळे दिसून येईल. कारण यामध्ये येणारे स्वीकृत नगरसेवक वेगवेगळ्या क्षेत्रातील असल्याने वेगवेगळ्या विषयांच्या माध्यमातून मनपामध्ये नवीन ऊर्जा निर्माण करण्याचे काम करतील.कारण त्यांचा दांडगा अनुभव व अभ्यास शहराच्या विकासासाठी हातभार अवश्य लावेल. स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती सामाजिक पातळीवर केली तर राज्याचे नाव देशामध्ये सुवर्ण अक्षरात कोरले जाईल.यासाठी सर्वच राजकीय पक्ष व सरकारने एकमत करून ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे. जेणेकरून सामाजिक कार्याला नवीन चालना मिळेल. जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# नेताजी सुभाष चंद्र बोस च्या जयंती निमित्ताने.

सुभाष चंद्र बोस यांच्या जयंती च्या दिवसाला पराक्रम दिवस असे सुद्धा म्हणतात. सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी कटक, ओडिशा (तेव्हाचे ब्रिटिश भारताचा भाग) येथे झाला. ते एका प्रतिष्ठित बंगाली कुटुंबातून आले होते. त्यांचे वडील जानकीनाथ बोस हे एक प्रतिष्ठित वकील होते.

सुभाषचंद्र बोस कटकमधील एका मोठ्या, प्रतिष्ठित बंगाली कुटुंबातून आले होते.त्यांचे वडील जानकीनाथ बोस ( (एक यशस्वी वकील आणि सरकारी वकील) आणि आई प्रभावती देवी होत्या. त्यांना चौदा भावंडे होती. ते चौदा मुलांपैकी नववा होते. यामध्ये ६ बहिणी आणि ८ भाऊ ते अनेक भाऊ आणि बहिणींसोबत एका उत्साही वातावरणात वाढले. ज्यात शरतचंद्र बोस (एक प्रमुख राजकीय सहयोगी) आणि डॉ. सुनील बोस (भारतातील पहिले हृदयरोगतज्ज्ञ) यांचा समावेश होता.

सुभाष चंद्र बोस यांच्या पत्नी एमिली शेंकलहोत्या.ज्या एक ऑस्ट्रियन स्टेनोग्राफर होत्या. ज्यांची त्यांना १९३४ मध्ये व्हिएन्ना येथे भेट झाली होती.ज्यांच्याशी त्यांनी १९३७ मध्ये गुप्तपणे (ऑस्ट्रियातील बॅडगास्टाइन) लग्न केले होते. त्यांना एक मुलगी होती अनिता बोस फाफ. युद्धकाळातील परिस्थितीमुळे त्यांचे नाते मोठ्या प्रमाणात गुप्त असले तरी, पत्रांद्वारे ते खोलवर आणि टिकून राहिले. एमिलीने अनिताला एकटे वाढवले आणि बोस यांच्या आठवणी जपल्या.

१९२० मध्ये त्यांनी आयसीएस ची परीक्षा पास केली. त्यामध्ये ते चौथे आले होते. यासाठी त्यांना खूप कमी वेळ मिळाला. परीक्षा पास होऊन सुद्धा त्यांनी नोकरी केली. काही काळ लंडनमध्ये नोकरी केली. पण नंतर मात्र काही दिवसात राजीनामा दिला. भारतात परत आल्यावर. चित्तरंजन दास यांच्या फॉरवर्ड नामक वृत्तपत्रांमध्ये लिहिण्याचे काम त्यांनी केले. ते काम करीत असताना त्यांनी स्वातंत्र्य विषयी खूप सारी जनजागृती आणि लोकांना जागृत करण्याचे काम केले. यामधून इंग्रज राजवटी विरोधात ते लिहायचे. काही दिवसांनी फॉरवर्ड वृत्तपत्राचे ते संपादक सुद्धा बनलेत. यांच्यामध्ये एवढी हुशारी होती की, कोणतीही गोष्ट जर त्यांनी निश्चय केला तर ती प्राप्त करणे त्यांना सहज जमायचे. या वृत्तपत्रांमध्ये इंग्रजांच्या विरोधात लिहिण्या कारणाने त्यांना १९२१ मध्ये सहा महिन्यांकरिता जेल सुद्धा झाली. आपल्या समाजामध्ये एक वेळ जर कोणी एखाद्या गुन्हा केला तर समाज त्या गुन्हेगाराला नीट बघत नाही .आणि जेल मधून येणारा व्यक्ती याला सुद्धा समाजात वावरण्याचे खूप लाज वाटायला लागते. यामुळे सहा महिने जेल भोगून आलेला व्यक्ती थोडीही मानसिकता न ढळू देता स्वतःच्या कार्याशी खूप प्रामाणिकपणे आपले कार्य त्यांनी पार पाडले.

यानंतर चित्तरंजन दास यांच्यासोबत काम



करीत असताना अनेक वेळ ते जेलमध्ये येणे आणि जाणे त्यांचे चालू झाले. १९२८ मध्ये नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी कलकत्ता येथे पहिल्या वेळेस वर्दीमध्ये २००० युवक व सैन्यासोबत पथसंचालन केले. इंग्रज यांना अक्षरशः घाबरवून टाकले. शत्रू सोबत ज्यावेळेस आपणाला लढायची असेल तेव्हा जर शत्रू आपली अजिबात दखल घेत नसेल तेव्हा आपण शत्रूच्या खूप मागे आहोत असे समजावे जेव्हा शत्रू तुमच्यावर टीका करायला लागतो. तेव्हा तुम्ही शत्रूच्या बरोबरीने आहात असे समजावे. आणि जेव्हा शत्रू हा आपल्यावर दगडफेक करायला लागतो तेव्हा आपण शत्रूच्या खूप समोर गेलेले असतो. हे आपण लक्षात ठेवायला पाहिजे. या नियमानुसार नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी इंग्रज सैन्याला हादरवून टाकले होते.

१९३८ मध्ये हरिहरपुर या ठिकाणीचे अधिवेशन झाले त्या अधिवेशनामध्ये नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी काँग्रेस ला म्हटले होते की ,आपण स्वातंत्र्याची तारीख निश्चित करा तर त्यांनी तारिक निश्चित न करता सोबतच इंग्रजांच्या सोबत त्यांना मोठ्या प्रमाणावर आंदोलन करायचे होते. पण याकरिता मोहनदास करमचंद गांधी हे तयार झाले नाही. मग नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी काँग्रेस सोडून १९३९ ला फॉरवर्ड ब्लॉक ची स्थापना करून इंग्रजा विरोधात नवीन स्वरूपात मोर्चा सुरू केली.

कलकत्त्यावरून नजरबंदी असताना सुभाष चंद्र बोस काबुल या ठिकाणी पोहोचले. कलकत्ता ते काबुल हा प्रवास काही साधा नव्हता. कुठे जीप कार तर कुठे कुठे पैदल आणि त्यामध्येही स्वतःचा वेश त्यांनी बदललेला होता. त्यामध्ये ते पठानच्या वेशात होते. त्या ठिकाणी त्यांची भेट हिटलर सोबत झाली. हिटलर यांनी इंग्रज साम्राज्याला उलथून टाकण्यासाठी पाहिजे ती मदत मी करण्यासाठी तयार आहे असा शब्द दिला. पूर्ण भारतावर राज्य इंग्रजाची असताना भारताच्या बाहेर जाणे इंग्रजांचा शत्रू तो आपला मित्र कसा बनेल त्याला आपल्या फेवरमध्ये कसे घ्यायचे या सर्वा चे चांगले ज्ञान नेताजी सुभाष चंद्र बोस यांना होते. याच सोबत जे विदेशामध्ये बंदी बनवलेले भारतीय यांना घेऊन त्यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली. म्हणजेच समाजकार्यामधील उपलब्ध साधनाच्या तत्वाचा वापर त्यांनी या ठिकाणी केला.१९४३ मध्ये, सुभाषचंद्र बोस यांनी २१ ऑक्टोबर १९४३ रोजी व्यापलेल्या सिंगापूरमध्येस्वतंत्र भारताचे तात्पुरते सरकार (आरझी हुकुमत-ए-आझाद हिंद)स्थापन केले , अक्ष राष्ट्रांच्या पाठिंब्याने (जपान, जर्मनी, इटली) निर्वासित सरकार स्थापन केले आणि ब्रिटन आणि अमेरिकेविरुद्ध युद्ध घोषित केले. त्यानंतर त्यांनी भारतीय राष्ट्रीय सैन्य (खछ) चे नेतृत्व स्वीकारले, त्याची पुनर्रचना केली आणि नंतर डिसेंबरमध्ये अंदमान आणि निकोबार बेटांना (त्यांना 'शहीद' आणि 'स्वराज' असे नाव दिले) भेट दिली, ब्रिटिश राजवटीपासून मुक्तता दर्शविणारा भारतीय ध्वज फडकावला.

४ जुलै १९४३रोजी सुभाषचंद्र बोस यांनी सिंगापूरमध्ये इंडियन इंडिपेंडन्स लीग आणि इंडियन नॅशनल आर्मी (खछ), ज्याला आझाद हिंद फौज म्हणूनही ओळखले जाते, यांचे नेतृत्व स्वीकारले.

आझाद हिंद सरकारचे सुभाष चंद्र बोस हे हेड ऑफ स्टेट, प्रधानमंत्री और युद्ध मंत्री चे पद साभाळले. म्हणजे एखाद्या व्यक्तीने जर ठरवले तर तो व्यक्ती पाहिजे तो करू शकतो आणि पाहिजे ते मिळवू शकतो. यामध्ये नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी जवळपास नऊ देशांची मान्यता मिळवलेली होती. यामध्ये जर्मनी जपान फिलिपिन्स सारखे देश यामध्ये सम्मिलित होते. यामध्ये त्यांनी प्रत्येक क्षेत्राच्या संदर्भात योजना बनवण्यावर भर दिला होता. नेताजींना खूप कमी संसाधने उपलब्ध होती तरीपण खूप मोठे ध्येय त्यांनी ठेवलेले होते. आझाद हिंद सेनेची स्वतःची बँक सुद्धा होती. यामध्ये दहा रुपयाच्या शिक्यापासून एक लाख रुपयाची नोट सुद्धा होती. त्या नोट वर सुभाष चंद्र बोस यांचा फोटो छापलेला होता. एकमेकाला अभिवादन करण्यासाठी जय हिंद या शब्दाचा वापर करण्यात आला.२१ मार्च १९४४ रोजी, सुभाषचंद्र बोस आणि इंडियन नॅशनल आर्मी (खछ) च्या प्रगत तुकड्यांनी बर्मा सीमा यशस्वीरित्या ओलांडली आणि भारतीय हद्दीत प्रवेश केला, विशेषतः मणिपूरपर्यंत पोहोचला. लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवण्याची स्वप्न हे सुभाष चंद्र बोस यांनी बघितले होते आणि तीच परंपरा आपण आज सुद्धा चालवत आहोत.

सुभाष चंद्र बोस यांनी जेवढी काही भाषणे दिलीत त्यापैकी बर्मा देशातील रंगून मधील जुबली हॉल या ठिकाणी दिलेल्या भाषणाने भारतीयच नाही. तर बाहेर देशातील बंदी असलेले भारतीय सुद्धा प्रभावित झाले.ज्यामध्ये ते म्हणतात की ,मुझे ऐसे नोजवानो की जरूरत है जो आपणा सिर काटकर स्वाधीनता की देवी को की देवी को भेट चढा सखे तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दूंगा खून की एक दो बूंद नही बल्की खून का एक महासागर तयार हो जाये जिसमे मै ब्रिटिश साम्राज्य को डुबो सकु अशा अनेक प्रेरित करणाऱ्या भाषणांनी भारतीय लोकांचे मन नेताजी यांनी जिंकले त्यांच्या शब्दावर भारतीय स्वतःचा जीव द्यायला तयार होत असत.

१८ ऑगस्ट १९४५ रोजी तैवान (तेव्हाचे जपानी फॉर्मोसा) येथे झालेल्या विमान अपघातात गंभीर भाजल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला होता. अधिकारी आणि ऐतिहासिक नोंदींनी त्यांचा मृत्यू व्यापकपणे स्वीकारला असला तरी, त्यांचा मृत्यू अजूनही गूढ आणि कट सिद्धांतांनी वेढलेला आहे.

**लेखक- प्रमोद पडघन**
**संपर्क- ९०७५९७७२३९**
**छत्रपती संभाजीनगर**

# ‘ग्राहक राजा’ च्या घोषणेतून हक्कजागृती पर्यंतचा प्रवास राष्ट्रीय ग्राहक दिन

भारतीय लोकशाहीची रचना तीन खांबांवर उभी आहे ते म्हणजे विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका. मात्र आधुनिक काळात एक चौथा, तितकाच महत्त्वाचा खांब पुढे आला आहे, तो म्हणजे ग्राहक. उत्पादन, सेवा, बाजारपेठ आणि अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असलेला ग्राहक हा आज केवळ खरेदीदार राहिलेला नाही, तर तो हक्क-जाणीव असलेला, प्रश्न विचारणारा आणि अन्यायाविरुद्ध उभा राहणारा नागरिक बनू लागला आहे. हीच जाणीव दृढ करण्यासाठी दरवर्षी २४ डिसेंबर हा ‘राष्ट्रीय ग्राहक दिन’ साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक कार्यक्रमांचा किंवा भाषणांचा नसून, तो आहे ग्राहक हक्क, जबाबदाऱ्या आणि बाजारातील नैतिकतेचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस. ग्राहक राजा आहे ही घोषणा ऐकायला आकर्षक वाटते; पण खरा प्रश्न असा आहे की आजचा ग्राहक खरोखरच राजा आहे का, की जाहिरातींच्या, ऑफर्सच्या आणि फसव्या आश्वासनांच्या जाळ्यात अडकलेला एक असहाय घटक?

२४ डिसेंबर १९८६ रोजी भारतात ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. याच ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा केला जातो. या कायद्याने भारतीय बाजारपेठेत एक मूलभूत बदल घडवून आणला. याआधी ग्राहक हा शोषण सहन करणारा, तक्रार करूनही न्याय न मिळणारा घटक होता. व्यापारी, उत्पादक आणि सेवा पुरवठादार यांच्यापुढे ग्राहकाची ताकद नगण्य मानली जात होती. ग्राहक संरक्षण कायद्याने प्रथमच ग्राहकाला कायदेशीर ओळख, हक्क आणि न्यायासाठी स्वतंत्र यंत्रणा दिली. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण मंचांच्या माध्यमातून ‘न्याय सहज, जलद आणि कमी खर्चात’ मिळावा, हा या कायद्याचा मूलमंत्र होता. त्यामुळे राष्ट्रीय ग्राहक दिन हा केवळ एक दिनविशेष न राहता, ग्राहक चळवळीचा मैलाचा दगड ठरला.

ग्राहक ही संकल्पना आज फार व्यापक झाली आहे. वस्तू खरेदी करणारा, सेवा घेणारा, ऑनलाईन व्यवहार करणारा, बँकिंग, विमा, आरोग्य, शिक्षण, दूरसंचार सेवा वापरणारा, हे सारे ग्राहकच आहेत. म्हणजेच, जन्मापासून मृत्यूपर्यंत माणूस ग्राहकच असतो. त्यामुळे ग्राहक हक्कांचा प्रश्न हा केवळ बाजारपेठेपुरता मर्यादित न राहता, तो थेट नागरिकांच्या जीवनमानाशी जोडलेला आहे. आज ग्राहक शोषणाची रूपे बदलली आहेत. पूर्वी मोजमापात फसवणूक, भेसळ, निकृष्ट दर्जा हे प्रकार प्रामुख्याने दिसत होते. आज त्यासोबतच डिजिटल फसवणूक, ऑनलाईन स्कॅम, लपविलेले शुल्क, चुकीच्या अटी, डेटाचा गैरवापर अशी नवी संकटे उभी राहिली आहेत. ग्राहक संरक्षण कायद्यानुसार ग्राहकाला काही मूलभूत हक्क दिले आहेत. जसा सुरक्षिततेचा हक्क, माहिती मिळण्याचा हक्क, निवडीचा हक्क, ऐकून घेण्याचा हक्क, तक्रार निवारणाचा हक्क आणि ग्राहक शिक्षणाचा हक्क. हे हक्क केवळ कागदावर मर्यादित राहू नयेत, तर ते व्यवहारात उतरवणे हीच राष्ट्रीय ग्राहक दिनाची खरी गरज आहे. कारण हक्क माहिती नसतील, तर ते वापरले जाणार नाहीत; आणि वापरले गेले नाहीत, तर ते निष्प्रभ ठरतात.

भारतात ग्राहक राजा आहे ही संकल्पना मोठ्या अभिमानाने मांडली जाते. जाहिराती, बॅनर, सरकारी मोहिमा यांतून हा संदेश दिला जातो. मात्र प्रत्यक्षात अनेक वेळा ग्राहक हा राजा नसून, प्रयोगाचा उंदीर ठरतो. आकर्षक जाहिरातींमागील अटी लपवल्या जातात, स्वस्ताच्या नावाखाली निकृष्ट सेवा दिली जाते आणि तक्रार केल्यावर ‘कस्टमर केअर’च्या फेऱ्यांत ग्राहक अडकतो. ग्राहक राजा बनण्यासाठी केवळ घोषणा पुरेशी नाही; त्यासाठी जाणीव, संघटितपणा आणि धैर्य आवश्यक आहे. अन्याय सहन न करता तक्रार करणे, पुरावे जपणे, मंचाचा वापर करणे, ही खरी राजेशाही आहे. आजचा ग्राहक डिजिटल झाला आहे. ऑनलाईन खरेदी, ॲप्स, कॅशलेस व्यवहार, ई-कॉमर्स यामुळे सोय वाढली आहे, पण धोकेही तितकेच वाढले आहेत. बनावट वेबसाईट्स, फेक रिव्ह्यूज, डेटा चोरी, ओटीपी फसवणूक या सगळ्यांचा सामना ग्राहकाला करावा लागतो. अशा काळात राष्ट्रीय ग्राहक दिन हा डिजिटल साक्षरतेचा आणि सतर्कतेचा संदेश देणारा दिवस ठरायला हवा. ‘स्वस्त’, ‘ऑफर’, ‘मर्यादित वेळ’ या शब्दांमागे न धावता विचारपूर्वक निर्णय घेणे, हीच आजच्या ग्राहकाची खरी गरज आहे.

हक्कांसोबत जबाबदाऱ्याही येतात. ग्राहकाने बिल घेणे, अटी वाचणे, फसवणूक लक्षात आल्यास तक्रार करणे, आणि चुकीच्या व्यवहाराला पाठिंबा न देणे ही त्याची सामाजिक जबाबदारी आहे. ग्राहक जागरूक नसेल, तर बाजारपेठ बेजबाबदार होते. राष्ट्रीय ग्राहक दिन हा केवळ व्यापाऱ्यांना इशारा देणारा नसून, ग्राहकांनाही आत्मपरीक्षण करायला लावणारा दिवस आहे. आपण स्वतः किती जागरूक आहोत, हा खरा प्रश्न आहे. ग्राहक चळवळ ही लोकशाहीला बळ देणारी चळवळ आहे. कारण ती सामान्य माणसाला न्याय मिळवून देते. आज अनेक प्रकरणांत ग्राहक मंचांनी मोठ्या कंपन्यांना दंड ठोठावले आहेत. यामुळे बाजारपेठेत जबाबदारी आणि पारदर्शकता वाढते. मात्र अजूनही अनेक ग्रामीण, गरीब, अशिक्षित ग्राहक या यंत्रणेपासून दूर आहेत. राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहक शिक्षण, जनजागृती आणि सुलभ न्यायव्यवस्था यावर अधिक भर देणे ही काळाची गरज आहे.

राष्ट्रीय ग्राहक दिन हा केवळ एक औपचारिक दिनविशेष नसून, तो आहे ग्राहकाच्या स्वाभिमानाचा आणि हक्कांचा उत्सव. ‘ग्राहक राजा आहे’ ही घोषणा तेव्हाच खरी ठरेल, जेव्हा ग्राहक स्वतः जागरूक, सजग आणि निर्भय बनेल. बाजारपेठ मोठी झाली आहे, व्यवहार वेगवान झाले आहेत, पण माणूस केंद्रस्थानी राहिला पाहिजे. ग्राहकाचे शोषण थांबवणे म्हणजेच लोकशाहीचे मूल्य जपणे होय. म्हणून राष्ट्रीय ग्राहक दिन हा केवळ स्मरणाचा नव्हे, तर संकल्पाचा दिवस ठरायला हवा. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि आपल्या हक्कांसाठी लढण्याचा. कारण जागरूक ग्राहक हाच सक्षम अर्थव्यवस्थेचा आणि न्याय्य समाजाचा खरा पाया आहे. राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त प्रत्येक ग्राहक जागरूक, सजग आणि निर्भय व्हावा, हक्कांची जाणीव केवळ कागदापुरती न राहता व्यवहारात उतरावी, बाजारपेठेत प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि जबाबदारी वाढावी आणि ‘ग्राहक राजा आहे’ ही संकल्पना खऱ्या अर्थाने साकार व्हावी, याच मनापासून शुभेच्छा !

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# यशवंत विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न




बीड/प्रतिनिधी-बीड शहरातील यशवंत विद्यालय या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा यशवंत माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश वाघ हे होते. तर उद्घाटक म्हणून शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या मार्गदर्शिका सौ सुधामतीताई वाघ ह्या होत्या. प्रमुख पाहुणे संस्थेचे सचिव नामदेव वाघ, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री धुमाळ एम.एस., श्री शरदचंद्र विद्यामंदिर या शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद गायकवाड, मथुराबाई पिंगळे विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल मुळूक, माऊली प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष माने, समर्थ गुरुकुल चे संचालक घाडगे, आई गुरुकुल चे संचालक जाधव, न्यू मानस गुरुकुल चे संजय सुरवासे पार्थ गुरुकुलचे भिंगले सर हे उपस्थित होते.

या वेळी बोलताना कार्यक्रमाचेअध्यक्ष गणेश वाघ यांनी सांगितले की, स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांमध्ये संघ भावना एकत्रित काम करण्याची सवय लागते आणि यातून नवीन कलाकार घडू शकतो.

तसेच संस्थेचे संस्थापक सचिव स्वर्गीय गोविंदरावजी वाघ यांनी संस्थेसाठी दिलेल्या अमूल्य योगदान व त्याच्या कार्याला उजाळा दिला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या उद्घाटक संस्थेच्या संचालक ज्येष्ठ मार्गदर्शक श्रीमती सुधामती वाघ यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत यापुढे ही विद्यार्थी गुणवत्ता विकास वाढीसाठी संस्था राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देऊन पालकांनी नियमित शाळेशी संपर्क ठेऊन आपल्या पाल्याच्या प्रगतीबाबत लक्ष ठेवावे असे सांगितले. वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमांमध्ये विविध प्रकारचे मराठी हिंदी गीत व नृत्य सादर करण्यात आले. कलाकारांनी यामध्ये हिरीरीने भाग घेतला. उद्घाटनपर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या शिक्षिका श्रीमती गर्जे एस.डी.यांनी केले. सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका श्रीमती फुके डी.एन. व श्री गाडेकर के.बी. यांनी तर आभार प्रदर्शन मुळे श्री ए.टी. व श्रीमती कुलकर्णी आर. ए. यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी विद्यार्थिनी व पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आ.)लढ्याला यश केवड येथील दलित स्मशानभूमीचा प्रश्न अखेर सुटला




केज/प्रतिनिधी -केज तालुक्यातील केवड येथील दलित समाजाच्या स्मशान भूमीवर शेतकऱ्यांनी केलेले अतिक्रमण हटविण्याची दीपक कांबळे यांनी केलेल्या मागणी आणि आंदोलनाला यश आले आहे. सदर अतिक्रमण तात्काळ अतिक्रमण हटवून खुले करण्याचे आदेश तहसीलदार यांनी भूमी अभिलेख विभाग आणि मंडळ अधिकाऱ्यांना दिले आहेत.

याबाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील केवड येथील गट नंबर ९५ मध्ये असलेल्या दलित समाजाच्या स्मशानभूमीवर शेजारील शेतकऱ्याने अतिक्रमण करून ती जमीन कसत होते. या गट नंबरमध्ये दलितांची मागील अनेक पिढ्या पासून दलित समाज त्या ठिकानी अंत्यविधी करीत आहेत. परंतु मागील तीन वर्षा पासून तेथील शेतकऱ्यांनी त्या स्मशान भूमीची जमीन वहीत करून त्यावर पेरणी करणे सुरू केले होते. त्यामुळे दलित समाजातील लोकांना अंत्यविधीसाठी अनेक समस्या येत होत्या. यामुळे हरेंद्र तुपारे समाधान तुपारे,उत्तरेश्वर तुपारे, भारत तुपारे, छबु तुपारे, शाहू तुपारे, सुदाम गवळी, अंकुश तुपारे, लक्ष्मण तुपारे, महेंद्र तुपारे, मिलिंद तुपारे, जालिंदर तुपारे, मधुकर तुपारे, भिमराव तुपारे, यांनी ही बाब रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांच्या निदर्शनास आणून दिली आणि अतिक्रमण हटविण्याची मागणी केली होती.

तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली रवींद्र जोगदंड, गौतम बचुटे, दिलीप बनसोडे, रमेश निशिगंध,सुरज काळे, प्रशांत हजारे, मिलिंद भालेराव, दादाराव धेंडे, विनोद शिंदे, बाळासाहेब जानराव,कैलाश जावळे,मसू बचुटे, हरिश गायकवाड,विनोद गायकवाड , राहूल काळे यांनी अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी मागील तीन वर्षापासून उपोषण, निदर्शने आणि आंदोलने करण्यात आली होती. जिल्हाधिकारी बीड आणि उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई, तहसीलदार यांना निवेदने देखील दिले होते.

या लढ्याला अखेर यश आले असून तहसीलदार राकेश गिड्डे यांनी दि. ५ जानेवारी रोजी भूमी अभिलेखचे उप अधीक्षक आणि मंडळ अधिकारी यांना काढलेल्या लेखी आदेशात जानेवारी पर्यंत हद्द व खुणा कायम करून ही स्मशानभूमी वापरासाठी ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्याचे आदेश पारित केला आहे.

# केजमध्ये पत्नीच्या अनैतिक संबंधाला कंटाळून तरुणाची आत्महत्या; प्रियकरासह सासूवर गुन्हा दाखल !




केज / प्रतिनिधी-केज शहरामध्ये पत्नीच्या अनैतिक संबंधाला कंटाळून तरुणानी आत्महत्या केली असुन प्रियकरासह सासू व पत्नीवर केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पत्नीचे अनैतिक संबंध व सासरच्या मंडळींकडून मिळणारी अपमान जनक वागणूकीला कंटाळलेल्या आणि सततचा सासरच्या मंडळ कडून होणारा अपमान सहन न होणाऱ्या मानसिक छळाला कंटाळून केज शहरातील फुलेनगर भागातील हाऊसिंग कॉलनी येथील एका ४४ वर्षीय तरुणाने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आपले जीवन संपवल्याची घटना घडली आहे. आश्रुबा उर्फ उत्तम शिवाजी जाधव असे या मृत तरुणाचे नाव असून, या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबतची केज पोलिसांकडून मिळालेली सविस्तर माहिती अशी की, आत्महत्या केलेला तरुण आश्रुबा उर्फ उत्तम जाधव हा सोलापूर जिल्ह्यात ऊसतोडणीचे काम करत होता. मात्र, गेल्या वर्षभरापासून त्याची पत्नी मनीषा हिचे केज शहरातील हाउसिंग कॉलनी येथे वास्तव्य असलेल्या मयूर प्रताप पाटील देशमुख याच्याशी अनैतिक संबंध होते. इतकेच नाही तर मयूरने मनीषाला स्वतंत्र खोली देखील करून दिली होती. या अवैध संबंधांना विरोध केला असता, पत्नी मनीषा, प्रियकर मयूर व मनिषाची आई मंगल खाडे यांनी आश्रुबा उर्फ उत्तम यांना सतत मानसिक व शारीरिक त्रास देण्यास सुरुवात केली होती. १९ जानेवारी रोजी मयूर पाटील याने आश्रुबा उर्फ उत्तम याला जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी सकाळी पत्नी व सासूने घरात घुसून जबरदस्तीने घरातील संसार उपयोगी सामान नेले आणि ’तुला जिवंत सोडणार नाहीत’ अशी धमकी दिली. या सततच्या अपमानाला आणि छळाला कंटाळून अखेर २० जानेवारी रोजी दुपारी आश्रुबा उर्फ उत्तम यांनी त्यांच्या राहत्या घरी लोखंडी अँगलला गळफास लावून आपली कायमची जीवन यात्रा संपवली. या प्रकरणी मृताचा भाऊ युवराज जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरून केज पोलीस ठाण्यात मयूर प्रताप पाटील देशमुख, पत्नी मनीषा आश्रुबा जाधव व सासू मंगल भारत खाडे या तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता व ट्रॅासिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास हा वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे हे स्वतः करत आहेत.

# शहरात जनविकास फाउंडेशनच्या हळदी-कुंकू महोत्सवास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

केज/प्रतिनिधी-केज शहरांमध्ये जनविकास फाउंडेशन आयोजित हळदी- कुंकू महोत्सवाचे आयोजन हे बुधवार रोजी पासून करण्यात आले आहे.

गुरुवार रोजी शहरातील महात्मा फुले नगर येथील जे.के.फंक्शन हॉल येथे हळदी-कुंकू महोत्सव संपन्न झाला. या जनविकास फाउंडेशन आयोजित हार्दिक कुंकू महोत्सवास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. या कार्यक्रमाला ६५० ते ७०० महिला सहभागी होऊन हळदी-कुंकू व अल्पोहाराचा लाभ घेतला आहे.



जनविकास फाउंडेशन आयोजित हळदी-कुंकू महोत्सव या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा केज नगरपंचायतचे गटनेते हारुणभाई इनामदार यांनी भेट देऊन महिलांशी संवाद साधून महिलांच्या अडीअडचणी व प्रश्न जाणून घेऊन चर्चा केली.

केज शहरातील सर्व प्रभागातील माझ्या बहिणींना हळदी-कुंकू महोत्सवाच्या माध्यमातून हितगुज साधता यावे व विचारांचे देवाण-घेवाण व्हावी यासाठी आम्ही गेल्या पाच वर्षापासून कार्यक्रम घेत आहोत. यावर्षीच्या हळदी,कुंकू महोत्सवास मोठ्या संख्येने माझ्या शहरातील सर्व बहिणीने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी केले आहे.

मागील पाच वर्षापासून केज शहरात महिलांसाठी जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख व जनविकास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ. हारुणभाई इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली व नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड यांच्या नेतृत्वाखाली हळदी-कुंकू महोत्सवाचे आयोजन केले जात आहे.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे महिलांना विचाराची देवाण-घेवाण करता यावी, महिलांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, महिलांच्या अडीअडचण समजावून घेऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी, महिलांनी सक्षम बनवून स्वतःच्या पायावर उभा टाकून महिलांनी स्वतःचे छोटे-मोठे उद्योग उभारून त्यांच्या कुटुंबाला हातभार लावण्यात यावा हा आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा डॉ.सौ.सीताताई बनसोड तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपच्या महिला आघाडीच्या उषाताई मुंडे, नगरसेविका सौ पद्मिनी आक्का शिंदे, ड. अनिताताई मुंडे, सामाजिक कार्यकर्त्या संगीताताई साळवे, प्रमिताताई कांबळे,महानंदा गायकवाड, रत्नमालाताई धीवार,प्रमिला मस्के, विमलताई जोगदंड, हजारे ताई यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना उषाताई मुंडे म्हणाले की, आमचे बंधू हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सीताताई बनसोड या सतत महिलांसाठी काम करत आहोत. अशा कार्यक्रमामुळे महिलांना प्रेरणा मिळते, केज शहरांमध्ये महिलांसाठी विविध प्रकारचे असे कार्यक्रम होणे गरजेचे आहे. पुढे बोलताना उषाताई मुंडे म्हणाल्या की, नगराध्यक्षा सीताताई बनसोड यांनी व त्यांच्या सर्व सहकारी नगरसेवकांनी केज शहरांमध्ये चांगल्या प्रकारची विकास कामे केलेले आहेत. असाच केज शहराचा विकास होण्यासाठी पुढील काळामध्ये देखील त्यांना सर्वांनी साथ देण्याची गरज आहे.

यावेळी प्रमिताताई कांबळे यांनी उपस्थित महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले. पुढे बोलताना सौ.कांबळे म्हणाल्या की, नगराध्यक्षा सीताताई बनसोड यांचे काम कौतुकास्पद आहे. महिलांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेणे काळाची गरज आहे. सीताताई बनसोड यांचा प्रवास हा संघर्षमय आहे त्या एक कार्यकर्ते म्हणून काम करत आल्या आणि नगराध्यक्षा ते डॉक्टरेट पदवी मिळून आज सीताताई बनसोडे या डॉक्टर झालेले आहेत. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून महिलांना संक्रातीच्या शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलताना नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड म्हणाल्या की, आमचे नेते हारुणभाई इनामदार हे सतत राजकीय क्षेत्र व्यतिरिक्त सामाजिक बांधिलकी जपत आहेत म्हणून ते लाडक्या बहिणीला भावाची तिळगुळाच्या माध्यमातून भेट देऊन बहिणी समवेत चर्चा करून हितगुज साधावे म्हणून हळदी-कुंकू महोत्सवाचे आयोजन हे मागील पाच वर्षापासून सातत्य पणे करत आहोत. केज शहरात मागील दोन दिवसापासून जनविकास फाउंडेशन आयोजित हळदी-कुंकू महोत्सवाचा कार्यक्रम मोठा उत्सवात चालू आहे. या कार्यक्रमाला महिलांचा मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे आम्ही भारावून गेलो आहोत. पुढे बोलताना बनसोड म्हणाल्या की, लवकरच जनविकास फाउंडेशनच्या माध्यमातून केज शहरांमध्ये महिलांसाठी विविध उद्योग चालू करणार आहोत.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती बोबडे मॅडम यांनी केले तर उपस्थितांचे आभार वर्षा राख यांनी मानले. सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जन विकास फाउंडेशनचे पदाधिकारी यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी विविध क्षेत्रातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विश्वशांतीसाठी मैत्र भावाचा जीवनमार्ग स्वीकारायला हवा सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. विश्वाधार देशमुख

लातूर -तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठावर असलेल्या जगाला विश्वशांती विश्व कल्याणासाठी मैत्र भावाचा जीवन मार्ग स्वीकारायला हवा असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक तथा वक्ते डॉ विश्वाधार देशमुख यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित महात्मा बसवेश्वर व्याख्यानमालेच्या पहिल्या विचारपुष्पात भूता परस्परे जडो, मैत्र जीवांचे या विषयावर मार्गदर्शन करत होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे हे होते तर विचारपिठावर उद्घाटक म्हणून शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी व्याख्यानमालेचे संयोजक डॉ. रत्नाकर बेडगे आदीची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले.

पुढे बोलताना डॉ. विश्वाधार देशमुख म्हणाले की, जग जिंकण्याकरिता युद्धाचा, कौर्याचा आणि कायद्याचा मार्ग असे अनेक मार्ग आहेत. पण करुणा, मैत्री, स्नेह, सौजन्य, सहिष्णुतेचा मार्ग अत्यंत सोपा आणि साधा असा मार्ग आहे. यातून व्यक्ती, समाज व राष्ट्राचे जीवन अधिकाधिक समृद्ध, सुखमय व आनंदी होईल. प्रत्येकाने काळजातला द्वेष संपवून मी पणा विसर्जित करावा लागेल. समाजाचे नेतृत्व शिक्षकांच्या हाती दिल्यास शुद्ध चारित्र्याची माणसे तयार होऊन समाजातला मैत्र भाव आपोआप वाढेल. आई वडील, पती-पत्नी, शिक्षक विद्यार्थी, पालक पाल्य, मित्र मैत्रीण ही नाती मानवी जीवन समृद्ध करतात. श्रीकृष्ण, तथागत गौतम बुद्ध, महात्मा बसवण्णा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार तत्त्वज्ञानात संत ज्ञानेश्वरांचा मैत्र भाव आपणास दिसून येतो असेही ते म्हणाले.

आपल्या उद्घाटपर मार्गदर्शनात शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, तथागत गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवतावादी धर्माचा स्वीकार करून जगाला स्नेह, प्रेम, आणि करुणेचा संदेश दिला. व्यक्तीने चराचरातील सर्वांकडे मैत्र भावनेतून पाहिले पाहिजे. तरच जगाचा उद्धार होईल असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की, महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात समतेचा संदेश जगाला दिला. वर्ण, जात, धर्म, वंश आणि वर्ग असा भेदभाव न करता सर्वांवर प्रेम करण्याचा संदेश दिला. देह हेच देवालय आहे, आत्मा हा परमेश्वर आहे. सदाचार म्हणजे स्वर्ग आणि अनाचार म्हणजे नरक आहे. इतक्या साध्या सोप्या भाषेत काव्य कायकवे कैलास हा श्रमाच्या उपासणेचा मार्ग बसवण्णांनी सांगितला. त्यांच्या विचार तत्त्वज्ञान जीवनकार्याचा वसा-वारसा पुढच्या पिढींना सांगितला गेला पाहिजे असेही ते म्हणाले

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागतपर मनोगत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे यांनी केले, प्रमुख अतिथीचा परिचय डॉ. मनोहर चपळे यांनी करून दिला, सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके व डॉ. अश्विनी रोडे यांनी केले तर आभार प्रा. व्यंकट दुडिले यांनी मानले.

या कार्यक्रमला शहरातील मान्यवर, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना , मुख्यालय लातूर च्या धाराशिव शाखेची उत्साहात स्थापना.

धाराशिव :- महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना,मुख्यालय लातूर ही महाराष्ट्रातील एकमेव शासनमान्यता प्राप्त संघटना असून परिचारिकांच्या कल्याणार्थ सनदशीर मार्गाने कार्य करत असते. याच संघटनेची ५१ वी शाखा धाराशिव येथे नुकतीच स्थापन करण्यात आली. यावेळी १७ जानेवारी रोजी सर्व उपस्थित परिचारिकांना संघटनेच्या राज्यसरचिटणीस श्रीमती सुमित्रा तोटे यांनी संघटनेची स्थापनेपासूनची घोडदौड आणि भविष्यातील कार्यपद्धती यावर संवाद साधला.




संघटनेच्या ( सार्वजनिक आरोग्य विभाग) राज्यसहसचिव श्रीमती जयश्री हेंडगे यांनी परिचारिकांच्या स्थानिक रुणालयीन समस्या आणि संघटित होण्याचे महत्व अधोरेखित केले. यावेळी राज्य उपाध्यक्ष श्री सुनील कुंटे यांच्यासह धाराशिव जिल्हा कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

अध्यक्षपदी श्रीमती मी ना सूर्यवंशी, उपाध्यक्ष श्री गोविंद शेळके, सचिव श्रीमती रेखा मुळे,सहसचिव श्रीमती नीता मोरे, खजिनदार श्रीमती मीनाक्षी गुळवे, संघटक श्री आशिष मगर, श्रीमती इंदुमती दराडे, आयुर्वेद शाखेच्या धनश्री शिंदे व सदस्य तसेच स्त्री रुग्णालयातील सदस्य उपस्थित होते. यावेळी धाराशिव जिल्हा अध्यक्ष श्रीमती मीना सुर्यवंशी यांनी परिचारिकांनी आपल्या समस्या सोडविण्यासाठी शासनमान्य संघटनेचे सदस्यत्व स्विकारण्याचे आवाहन केले तसेच परिचारीकांनी आपल्या न्याय हक्कासाठी जागरुक असावे, निर्भीडपणे व्यक्त व्हावे. योग्य व आवश्यक त्या ठिकाणी संघटनेची मदत घ्यावी असे सांगून महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना धाराशिव शाखा परिचारीकांच्या न्याय हक्कासाठी कार्यरत राहील असे प्रतिपादन केले.या सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व अभिनंदन

# हिंद दि चादर तेग बहादुर यांच्या शहीद समागम दिनानिमित्त जि प प्रा शा डोंगरगाव(बोरी) येथे अभिवादन सभा

शि अनंतपाळ : - शिरूर अनंतपाळ तालुक्यातील डोंगरगाव बोरी येथील जिल्हा परिषद



शाळेत हिंद दि चादर गुरुतेग बहादुर यांच्या शहीद समागम दिनानिमित्त अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविकांत नागमोडे यांच्या हस्ते गुरुतेग बहादुर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यानंतर शाळेचे मुख्याध्यापक रवी कुरील यांनी तेग बहादुर यांच्या बद्दल सखोल अशी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली यावेळी शाळेतील शिक्षिका श्रीमती शितल काळे अंगणवाडी सेविका रेणुका गायकवाड लक्ष्मीबाई जाधव बालाजी जाधव यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# पीपल्स रिपब्लिकन पार्टीला मनपात स्वीकृत सदस्यपद द्या- जिल्हाध्यक्ष एन डी सोनकांबळे यांची मागणी

लातूर :- महाराष्ट्रात लोकसभा ,विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या पीपल्स रिपब्लिकन पार्टीने भाजप महायुतीला पाठींबा दिला आहे. त्यामुळे लातूर शहर महानगरपालिकेत पीपल्स रिपब्लिकन पार्टीला स्वीकृत सदस्यपद देण्यात यावे, अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे लातूर जिल्हाध्यक्ष एन.डी. सोनकांबळे यांनी एका निवेदनाद्वारे भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्याकडे केली आहे.



पीपल्स रिपब्लिकन पार्टीने भाजप - महायुतीला राज्यात पार पडलेल्या निवडणुकात सर्वतोपरी सहकार्य केले आहे. या सर्व निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी आणि पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या पाठींब्याने बहुसंख्य उमेदवारांनी भरघोस मते मिळवून दिल्याने जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्याकामी मोलाची भूमिका बजावली आहे. भाजपच्या या यशात पीपल्स रिपब्लिकन पार्टीचाही महत्वपूर्ण वाटा आहे. ही बाब लक्षात घेऊन लातूर शहर महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक म्हणून पीपल्स रिपब्लिकन पार्टीला संधी द्यावी,अशी अपेक्षा निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. केवळ मनपातच नव्हे तर आगामी जिल्हा परिषद - पंचायत समितीच्या निवडणुकीतही ही युती कायम राहणार असल्याने या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्वीकृत सदस्यपदी तसेच शासन स्तरावरील सर्व कमिटीमध्येही पीपल्स रिपब्लिकन पार्टीला सन्मानपूर्वक सामावून घेऊन योग्य ते प्रतिनिधित्व देण्याची मागणीही करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे ,भाजप शहर जिल्हाध्यक्ष पाटील यांच्यासोबतच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक प्रमुख माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेशआप्पा कराड यांनाही देण्यात आल्या आहेत.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.